Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १४७ • Title - Code :- MAHMAR49513 • मंगळवार दि.२७ फेब्रुवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# राज ठाकरे यांनी घेतला २१ लोकसभा मतदारसंघाचा आढावा

## महायुती सोबत जाणार की, स्वतंत्र्य लढवणार? याबाबत संभ्रम कायम

**मुंबई–आगामी काळात होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी राज्यातील २१ लोकसभा मतदारसंघाचा आढावा घेतला. महाराष्ट्र नवनिर्माण सेना ही महायुती सोबत निवडणूक लढवणार की, स्वतंत्र्य निवडणुकीला सामोरे जाणार याबाबत अद्याप संभ्रम कायम आहे. असे असतानाच राज ठाकरे यांनी राज्यातील २१ लोकसभा मतदारसंघाचा आढावा घेतला आहे. यामध्ये पुणे, कोल्हापूर, नाशिक, बुलढाणा, छत्रपती संभाजीनगर आणि सोलापूर या महत्त्वाच्या मतदारसंघाचा देखील समावेश आहे.**

पुढील महिन्यात लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. असे असताना सर्वच राजकीय पक्षांच्या वतीने निवडणुकीची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेना देखील या पुढील प्रत्येक निवडणुकीत सक्रिय सहभाग घेणार असल्याची घोषणा राज ठाकरे यांनी काही वर्षांपूर्वीच केली होती. त्यानुसार आगामी लोकसभा निवडणुकीला मनसे सामोरे जाणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. लोकसभा निवडणुकीत मनसेही महायुती सोबत निवडणुकीला सामोरे जाण्याची शक्यता देखील वर्तवण्यात येत आहे. काही दिवसांपूर्वीच भाजपचे मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यांनी राज ठाकरे यांची भेट घेतली होती. त्यानंतर राज ठाकरे युतीची घोषणा करणार असल्याची शक्यता वर्तवली जात होती. मात्र तसे झाले नाही. याबाबत आपण योग्य वेळी बोलणार असल्याचे राज ठाकरे यांनी सांगितलं होतं. या सर्व पार्श्वभूमीवर मनसेच्या नेत्यांची ही आढावा बैठक महत्त्वाची मानली जात आहे.राज ठाकरे यांनी राज्यातील जवळपास २१ लोकसभा मतदारसंघाचा आढावा घेतला आहे. यामध्ये पुणे लोकसभा मतदारसंघ, कोल्हापूर लोकसभा मतदारसंघ, नाशिक, बुलडाणा, छत्रपती संभाजीनगर आणि सोलापूर लोकसभा मतदारसंघाचा देखील समावेश आहे. गेल्यावेळी महाराष्ट्र निर्माण सेनेने लोकसभेची निवडणूक लढवली नव्हती. त्यानंतर मनसेवर जोरदार टीका देखील झाली होती. त्यानंतरच्या काळात राज ठाकरे यांनी आगामी काळातील सर्व निवडणुकीला मनसे सामोरे जाणार असल्याचा जाहीर केले होते. त्यामुळे आता राज ठाकरे यांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागलं आहे.



राज ठाकरे यांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष

# कृषी भूषण प्राप्त नामदेवजी दडमल यांचा सत्कार

**चिमूर । प्रतिनिधी**

लावरी येथील कृषीभूषण पुरस्कार प्राप्त प्रगतशील शेतकरी तसेच चिचाळा शास्त्री गट ग्रामपंचायत चे माजी सरपंच व प्रगतशील शेतकरी नामदेव हरकू दडमल यांचा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. सतिश वारजूकर यांचे कडून शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.



चिमूर तालुक्यातील शंकरपूर येथून सात किमी अंतरावरील लावारी या छोट्याशा गावातील प्रगतशील शेतकरी नामदेव हरकू दडमल यांना कृषिभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. आदिवासी गटातून त्यांना कृषीभूषणा पुरस्कार मिळाला असून अन्य गटातून चंद्रपूर जिल्ह्यातील इतर चार शेतकऱ्यांनाही कृषीभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. २०२३ च्या फेब्रुवारी महिन्यात चंद्रपूर येथे आयोजित कृषी प्रदर्शनात सेंद्रिय शेतीद्वारे टमाटराचे उत्पादन घेतल्याबद्दल प्रमाणपत्र देऊन दडमल यांना सन्मानित करण्यात आले होते. नामदेव दडमल यांनी अशिक्षित असतानाही रात्रीच्या शाळेमधून शिक्षण घेऊन पाच वर्ष सरपंच पदाचा कारभारही अत्यंत चोखपणे केला. त्यांनी आपल्या शेतीमध्ये बाराही महिने भाजीपाल्याचे लाखो रुपयांचे उत्पादन घेतले. स्वतःच्या शेतात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, रासायनिक खतांचा वापर न करता सेंद्रिय खताच्या, गांडूळ खताच्या माध्यमातून शेतीतून विषमुक्त भाजीपाल्याचे व अन्नधान्याचे ते उत्पादन घेतात. त्यामुळे त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला.

त्या निमित्त राष्ट्रीय उपाध्यक्ष ओबीसी महासंघ महाराष्ट्र प्रदेश तथा समन्वयक चिमूर विधानसभा क्षेत्र डॉ. सतिश वारजुकर यांनी लावारी येथे जाऊन त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला यावेळी चिमूर तालुकाध्यक्ष काँग्रेस कमिटीचे डॉक्टर विजय भाऊ गावंडे व बरेच काँग्रेस कार्यकर्ते व गावातील नागरिक उपस्थित होते.

# महानगर भाजपा अनुसूचित जाती मोर्चाची कार्यकारिणी जाहीर

## भाजपा अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष धम्मप्रकाश जा.भस्मे यांनी केली घोषणा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी जिल्हा महानगर चंद्रपूर अंतर्गत जिल्हा महानगर असलेल्या अनुसूचित जाती मोर्चाची कार्यकारिणी नुकतीच मोर्चाचे अध्यक्ष धम्मप्रकाश जा. भस्मे यांनी जाहीर केली आहे. कार्यकारिणीत महामंत्रीपदी निलेश हिवराळे, प्रभाकर बावणे, सागर भगत, राजेश थुल, राहूल नगराळे, अमित निरंजने असून उपाध्यक्षपदी डॉ. प्रमोद रामटेके, दिप्तीकेश निरंजने, रमेश पुलिपाका, वैभव मेश्राम, राहूल बोरकर, लक्ष्मी लोणारे (खोब्रागडे), मोरेश्वर खैरे, शुभम सुलभेवार, हर्ष महातव यांना संधी मिळाली आहे.

सचिवपदी सुरेश जांभुळकर, माया पडवेकर, पंकज घडसे, डॉ. परमेश्वर लभाने, पंचशिला चिवंडे, शैलेश शामकुळे, राहूल मेंढे, निश्चय जवादे, निखिल दारुडे, कुलदिप पिंपळकर, संजय उराडे, पियुष लाकडे यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे महाराष्ट्राचे वन व सांस्कृतिक कार्य तथा मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, केंद्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा माजी केंद्रीय गृहराज्य मंत्री हंसराज अहीर, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा , आमदार कीर्तीकुमार भांगडीया , आमदार रामदास आंबटकर , भाजपाचे ज्येष्ठ नेते चंदनसिंह चंदेल , माजी आमदार प्रा. अतुल देशकर , ड.संजय धोटे, माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, महानगराचे जिल्हाध्यक्ष राहुल पावडे , विद्या देवाडकर प्रदेश भाजपा चिटणीस , प्रदेश महिला मोर्चा सरचिटणीस अल्का आत्राम,माजी आमदार जैनुद्दीन जव्हेरी , सुदर्शन निमकर , भाजपा नेते अशोक जिवतोडे जिल्हा महामंत्री डॉक्टर मंगेश गुलवाडे , संध्या गुरूनुले , ब्रिजभूषण पाझारे, राजू गायकवाड,विवेक बोडे, भाजपा ज्येष्ठ नेते विजय राऊत , प्रमोद कडू, खुशाल बोंडे , राजेंद्र गांधी, रमेश राजूरकर , संजय गजपुरे , नामदेव डाहुले , अनिल डोंगरे, आशिष देवतळे, अरुण मडावी, महेश देवकाते, वंदना शेंडे, गौतम निमगडे, डॉ.अंकुश आगलावे, बंडू गौरकार , इमरान पठाण आदींनी अभिनंदन केले आहे.

# अलि असगर सैफी यांची भारतीय जनता युवा मोर्चा पुलगाव शहर अध्यक्षपदी

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिय भारतीय जनता युवा मोर्चा पुलगाव शहर कार्यकारिणीची बैठक श्यामा प्रसाद जी मुखर्जी बॅडमिंटन मैदानावर संपन्न झाली.यात येथील युवा व्यापारी व भारतीय जनता युवा मोर्चाचे कार्यकर्ते अली असगर सैफी यांची भारतीय जनता युवा मोर्चा शहर अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. येथील युवा मोर्चा कार्यकर्त्यांच्या बैठकीमध्ये खासदार रामदास तडस, देवळी पुलगाव विधानसभा प्रमुख राजेश बकाणे, भाजपा पुलगाव शहर अध्यक्ष नितीन बडगे, प्रदेश सचिव अल्पसंख्याक मोर्चा शकील खान, जिल्हा सरचिटणीस राहुल चोपडा, जिल्हा उपाध्यक्ष मधुकरराव रेवतकर, ओ.बी.सी. मोर्चा वर्धा जिल्हा.अध्यक्ष मंगेश झाडे, जिल्हा सरचिटणीस महिला मोर्चा माधुरी इंगळे, शहर अध्यक्ष महिला मोर्चा रिता येटीवार, पुलगाव देवळी विधानसभा भाजयुमो प्रभारी अरविंद झाडे,संजय गांधी निराधार योजना सभापती किशोर गव्हाळकर, जिल्हा भाजपा सदस्य गिरीश चौधरी आणि भाजयुमो पुलगाव शहर प्रभारी गजेंद्र चंदेल यांनी त्यांच्या शुभेच्छांसह अली असगर सैफी यांची पुलगाव शहर युवा मोर्चाच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली. भाजयुमो शहराध्यक्षपदी नियुक्ती झाल्यानंतर शहरातील अनेक तरुण-तरुणी अलि असगर सैफी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता युवा मोर्चा पुलगाव शहरात दाखल झाले.अलियासगर सैफी यांची भाजयुमो शहर अध्यक्षपदी नियुक्ती झाल्यावर उपस्थित सर्व भाजपा व आघाडी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांना आशीर्वाद व पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

# जरांगे कोणाचे पाप सर्वांनाच माहिती-वडेट्टीवार यांचा हल्ला

## जे पेराल तेच उगवेल, कोणाचे ओएसडी भेटत होते महाराष्ट्राला माहिती’

**मुंबई**–जरांगे हे कोणाचे पाप, हे सर्वांना माहिती आहे. कोणाचे ओएसडी आणि पीए त्यांना भेटण्यासाठी जात होते, हे देखील पूर्ण महाराष्ट्राला माहिती असल्याची टीका विधानसभेचे विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला आजपासून सुरुवात झाली. या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी राज्य सरकार तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जारेदार हल्लाबोल केला. राज्यात सुरू असलेल्या मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर त्यांनी सडकून टीका केली. जरांगे यांना कोणी तयार केले. त्यांना तयार करणारे कोण? त्यांची इच्छाशक्ती वाढवणारे कोण? सर्व महाराष्ट्राला माहिती आहे. कोणाचे ओएसडी त्यांना भेटण्यासाठी जात होते? कोणाचे पीए जात होते? कोण तडजोडी करत होते? कोण त्यातून मार्ग काढत होते? त्यातून जरांगे यांची हिम्मत कोण वाढवत होते? हे सर्वांना माहिती आहे. हे कोणाचे पाप आहे, हे सर्वांना माहिती आहे. आमचे पीए थोडीच त्यांना भेटण्यासाठी जात होते. जे पेराल तेच उगवेल अशा शब्दात विजय वडेट्टीवार यांनी नाव न घेता देवेंद्र फडणवीस आणि राज्य सरकार यांच्यावर टीका केली.



राज्यात मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात सुरू असलेल्या मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या वतीने विशेष अधिवेशनाच्या माध्यमातून स्वतंत्र दहा टक्के आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. मात्र, असे असले तरी मनोज जरांगे पाटील यांना ओबीसी समाजातूनच आरक्षण हवे आहे. त्यामुळे त्यांनी आंदोलन कायम ठेवले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर विरोधकांच्या वतीने राज्य सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न या अधिवेशनात केला जाणार आहे.आगामी काळात होणाऱ्या लोकसभा तसेच त्यानंतर होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या वतीने अंतरीम अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे. या अधिवेशनाच्या माध्यमातून राज्य सरकार आगामी काळात होणाऱ्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काही महत्त्वाच्या घोषणा करण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# ‘फसवणूक नको मराठा समाजाला आरक्षण द्या’:विरोधकांकडून विधिमंडळाच्या पायऱ्यांवर सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी

मुंबई-राज्यविधीमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन मुंबई येथे आजपासून सुरू झाले. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी कामकाज सुरू होण्यापूर्वीच विधिमंडळाच्या पायऱ्यांवर विरोधकांनी आंदोलन केले. आरक्षणाच्या मुद्यावरून विरोधक आक्रमक झाले. 'फसवणूक नको आरक्षण द्या', 'महायुती सरकारचा जागर, आरक्षणाचे रोज नवीन गाजर' म्हणत सरकारच्या विरोधात जोरदार निदर्शने केली.

याप्रसंगी विरोधकांनी पायऱ्यांवर धिक्कार असो, मराठा समाजाच्या जीवाशी खेळणाऱ्या सरकारचा धिक्कार असो, मराठा समाजाची फसवणूक करणाऱ्या सरकारचा धिक्कार असो, मराठा – ओबीसींची फसवणूक करणाऱ्या सरकारचा धिक्कार असो, अशा घोषणा देत सरकार विरोधात निदर्शने केली.विधान सभा आणि विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते आणि महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधान भवनाच्या पायऱ्यांवर जोरदार निदर्शने केले. यावेळी काँग्रेसचे विधिमंडळ गटनेते बाळासाहेच थोरात, नितीन



राऊत, अमीन पटेल, अमित देशमुख, धीरज देशमुख, जितेश अंतापुरकर, भाई जगताप, राजेश राठोड, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) विधिमंडळ गटनेते अजय चौधरी, राजन साळवी, नरेंद्र दराडे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गटाचे) अनिल देशमुख, सुनील भुसारा, विनोद निकोले यांच्या उपस्थितीत विरोधी पक्षाच्या आमदारांनी मराठा आणि ओबीसी समाजाची आरक्षणाच्या मुद्द्यावर फसवणूक करणाऱ्या सरकारविरोधात घोषणा लिहिलेले फलक घेत जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला.

# सुतार समाजाचा प्रबोधन मेळावा व गुणगौरव सोहळा संपन्न

**चिमूर । प्रतिनिधी**

शंकरपूर येथील श्री प्रभू विश्वकर्मा सुतार समाज संघटनेच्या वतीने श्री प्रभू विश्वकर्मा जयंती प्रबोधन मेळावा गुणवंत गौरव सोहळा चे आयोजन हनुमान किल्ला मंदिर येथे २५ फेब्रुवारीला करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा परिषद चे माजी अध्यक्ष डॉक्टर सतीश वारजुकर अध्यक्षस्थानी पंचायत समितीचे माजी उपसभापती रोशन ढोक विशेष अतिथी म्हणून सरपंच साईश सतीश वारजूकर प्रमुख पाहुणे म्हणून माजी पंचायत समिती सदस्य भावना बावनकर उपसरपंच अशोक चौधरी सुतार समाज संघटनेचे अध्यक्ष सुरेश वांढरे उपाध्यक्ष अशोक गहूकर उपस्थित होते या मेळाव्यात गुणवंत विद्यार्थी आंबोली येथील पौर्णिमा वांढरे प्रसाद वांढरे खैरी येथील गौरी शास्त्रकार शंकरपूर येथील विषातन गौरकर या विद्यार्थ्यांचा शाल श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आलेला आहे. याच कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आलेला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोद गौरकर, प्रास्ताविक सुरेश वांढरे, आभार अशोक गहुकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वसंता गहूकर, विनोद वांढरे, नरेंद्र वांढरे, रामदास वांढरे, भास्कर वांढरे, बारसू राखुंडे, लहू नांदेकर, जगदीश घोंगे, प्रदीप राखुंडे, राघोजी अंडरस्कर, अजय वांढरे आधी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# माझी मराठी अमर होती, आहे व राहिलच!

**ज्ञानपीठ पुरस्कार विजेते मराठी कवी कुसुमाग्रज- वि.वा.शिरवाडकर यांचे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यांना अभिवादन म्हणून दि.२१ जानेवारी २०१३ रोजी महाराष्ट्र शासनाने त्यांचा जन्मदिवस- २७ फेब्रुवारी हा मराठी भाषा गौरव दिन म्हणून घोषित केला. मराठी राजभाषा दिन आणि मराठी भाषा गौरव दिन हे दोन्ही दिवस वेगवेगळे असून मराठी भाषेसंदर्भातील महत्त्वाचे आहेत. मात्र दोन्ही एकच समजण्याची चूक करू नये. कारण माझ्या मराठीचा उदोउदो करण्यास ते दोन्ही दिवस कामाचेच आहेत. श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी- अलककार यांच्या शब्दांतून मराठीचा अभिमान जागवा... संपादक.**

माझी मराठी भाषा ही इंडो-युरोपीय भाषाकुळातील एक भाषा आहे. ती भारताच्या २२ अधिकृत भाषांपैकी एक आहे. माझी मराठी महाराष्ट्र राज्याची अधिकृत तर गोवा राज्याची सहअधिकृत भाषा आहे. सन २०११च्या जनगणनेनुसार भारतात मराठी भाषकांची एकूण लोकसंख्या सुमारे ९ कोटी आहे. मातृभाषा असणाऱ्या लोकांच्या संख्येनुसार मराठी ही जगातील दहावी व भारतातील तिसरी भाषा ठरते. ती भारताच्या प्राचीन भाषांपैकी एक असून महाराष्ट्री प्राकृतचे आधुनिक रूप आहे. पवित्र ग्रंथराज ज्ञानेश्वरी हा मराठीतील ७४५ वर्ष जुना पहिला ग्रंथ आहे. मराठीचे वय सुमारे एक हजार वर्षे असूनही तिला अभिजात भाषेचा दर्जा का नाही? याची मला खंत वाटते. मराठी भाषेचा गौरव संतशिरोमणी ज्ञानेश्वर माऊलींनी त्यांच्या साहित्यातूनही केलेला दिसून येतो-

माझ्या मराठीची बोलु कौतुके!
परि अमृतातेही पैजा जिंके!!

महाराष्ट्र हे मराठी भाषिकांचे राज्य म्हणून मराठी भाषेला वेगळे महत्त्व प्राप्त झालेले आहे. आजतागायत मराठी भाषेतून अनेक श्रेष्ठ साहित्यकृती निर्माण झालेल्या आहेत आणि त्यात सातत्यपूर्ण रीतीने भर पडत आहे. कुसुमाग्रजांच्या शब्दांत मराठी भाषा गुणगौरव-

माझ्या मराठी मातीचा लावा ललाटास टिळा।
तिच्या संगाने जागल्या दऱ्याखोऱ्यातील शिळा।।

मराठी भाषा गौरव दिन हा दरवर्षी २७ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्राचे ज्येष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवशी साजरा करण्यात येतो. त्यांचा जन्म पुणे येथे दि.२७ फेब्रुवारी १९१२ रोजी झाला. कवीवर्य कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्रच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले आहेत. आपल्या मातृभाषेचा गौरव व कविराज कुसुमाग्रजांच्या स्मृतींना अभिवादन करण्याच्या हेतूने त्यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात यावा, असा शासन निर्णय दि.२१ जानेवारी २०१३ रोजी घेण्यात आला. कारण मराठी भाषा अमर झाली असल्याचे कविराज कुसुमाग्रज सांगतात-

विजयासाठी कविता माझी कधीच नव्हती,
म्हणून नव्हती भिती तिजला पराजयाची!
जन्मासाठी हटून केव्हा नव्हती बसली,
म्हणून नाही खंतही तिजला मरावयाची!!

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते मराठी कवी कुसुमाग्रज यांचे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान महत्त्वपूर्ण असल्याने त्यांना अभिवादन म्हणून २१ जानेवारी २०१३ रोजी महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार कुसुमाग्रजांचा जन्मदिवस २७ फेब्रुवारी हा मराठी भाषा गौरव दिन म्हणून घोषित करण्यात आला. महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण २०१०मध्ये त्यांचा जन्मदिवस- २७ फेब्रुवारी हा मराठी भाषा गौरव दिन म्हणून नमूद केलेला आहे. दि.१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली, तेव्हापासून १ मे हा दिवस मराठी राजभाषा दिन किंवा मराठी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो. महाराष्ट्राची अधिकृत राजभाषा ही मराठी असेल, असे जाहीर करणारे वसंतराव नाईक सरकार यांनी मराठी राजभाषा अधिनियम १९६४ सर्वप्रथम दि.११ जानेवारी १९६५ रोजी प्रसिद्ध केला. सन १९६६पासून तो अंमलात आला. १ मे रोजी मराठी राजभाषा दिनाच्या निमित्ताने घोषणा करीत असतांना त्यांनी मांडलेले मराठी भाषा दिनावरील विचार प्रेरक होते. वसंतराव नाईक सरकारने पुढे मराठी भाषा संवर्धनासाठी राज्यात पहिल्यांदाच भाषा संचालनालयाची निर्मिती केली व प्रादेशिक स्तरावर चार केंद्राची स्थापना केली. राज्यकारभार मराठीतून चालणार, असे अधिकृतपणे जाहीर केले होते. मराठी भाषा गौरव दिवस- २७ फेब्रुवारी आणि मराठी भाषा दिवस- १ मे हे स्वतंत्र दिवस असून त्या दिवसांचे स्वतंत्र असे महत्त्व आहे. नादमधुर काव्यलेखन शैलीनेही माझ्या मराठीचा गोडवा अधिकच पसरविण्यात ते पुढेच असल्याचे कळते-

ओळखलात का सर मला?
पावसात आला कोणी.
कपडे होते कर्दमलेले,
केसांवरती पाणी!

विष्णू वामन शिरवाडकर तथा तात्यासाहेब शिरवाडकर हे मराठी भाषेतील अग्रगण्य कवी, लेखक, नाटककार, कथाकार व समीक्षक होते. त्यांनी कुसुमाग्रज या टोपणनावाने कवितालेखन केले. ते आत्मनिष्ठ व समाजनिष्ठ जाणीव असणारे मराठीतले महत्त्वाचे लेखक मानले जातात. शिरवाडकरांचे वर्णन सरस्वतीच्या मंदिरातील देदीप्यमान रत्न असे करतात. तर वि.स.खांडेकर यांच्यानंतर मराठी साहित्यात ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणारे ते दुसरे साहित्यिक होते. ज्ञानपीठ पुरस्कार हा भारतीय साहित्य जगतात नोबेल पुरस्काराइतकाच सर्वश्रेष्ठ पुरस्कार समजला जातो. अशा या थोर साहित्यिकाचे दि.१० मार्च १९९९ रोजी निधन झाले.

!! जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन आणि मराठी भाषा गौरव दिनाच्या मराठी बांधवांना सप्ताहभर प्रेरक हार्दिक शुभेच्छा !!

**श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी-**
**अलककार प.पू. गुरुदेव हरदेव कृपानिवास,**
**रामनगर- गडचिरोली.**
**व्हॉट्सप. ९४२३७१४८८३.**

# 'टायनी एंजल्स' मधील दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा समारंभ

**नांदेड । प्रतिनिधी**

नवरत्न रामराव मेमोरियल एज्युकेशन ट्रस्ट द्वारा संचलित टायनी एंजल्स शाळेतील इंग्रजी व सेमी इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना शालांत परीक्षेसाठी शुभेच्छा देण्याचा कार्यक्रम संस्थेमध्ये पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था नांदेड मधील शिल्पनिदेशक प्रा. सचिन राका सर, संस्थेच्या अध्यक्षा डॉ. संध्या देवेंद्र जोशी, सचिव गिरीश डाफणे, सौ दिपाली डाफणे, प्राचार्य संतोष कुलकर्णी, मुख्याध्यापक गंगाधर पोवाडे, नागोराव जोंधळे यांची यावेळी उपस्थिती होती.



संस्थेचे सचिव गिरीश डाफणे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा संस्थेच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी दहावी परीक्षेला सामोरे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. सचिन राका यांनी दहावीनंतर उपलब्ध असणारे करिअरचे विविध कोर्सेस व व्यवसायाच्या संधी याबद्दल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी स्वतःला ज्या क्षेत्रामध्ये विशेष रस व रुची आहे ते करिअरचे क्षेत्र निवडण्याविषयी मार्गदर्शन केले. केवळ डॉक्टर, इंजिनियर होण्यापेक्षा कौशल्यावर आधारित व्यावसायिक शिक्षणाकडे विद्यार्थिनी वळले पाहिजे यामधून मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध असून आपण स्वतः उद्योजक सुद्धा या माध्यमातून होऊ शकतो असे त्यांनी सांगितले. सध्या औद्योगिक कंपन्यांमधून आयटीआय मधून तंत्र शिक्षण घेतलेल्या, प्रशिक्षित तरुणांना मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच डिप्लोमा इन इंजिनिअरिंग, फार्मसी तसेच इतर कौशल्यावर आधारित व्यावसायिक अभ्यासक्रमांची त्यांनी तोंडओळख करून दिली.

यावेळी गिरीश डाफणे यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांनी वर्षभर विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेऊन आपल्या व्यक्तिमत्त्वाला अभ्यास व सरावाच्या मदतीने प्रगतीच्या दिशेकडे नेण्याचा प्रयत्न केला असल्याचे सांगून सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. शालेय जीवन संपवून सर्व विद्यार्थी महाविद्यालयीन आयुष्याकडे वाटचाल करत असताना करिअरच्या दृष्टीने जागरूक राहून कष्टाच्या मदतीने यशस्वी होण्यासाठी योग्य मार्ग निवडावा असे आवाहन केले. अध्यक्षीय समारोप करताना संस्थेच्या अध्यक्षा डॉ संध्या देवेंद्र जोशी यांनी त्यांनी एंजल्स मधील तज्ञ व अनुभवी शिक्षकांनी सराव परीक्षांचे राऊंड्स घेतल्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेची भीती वाटत नसल्याचे सांगितले. शाळेतील शिक्षकांनी घेतलेल्या अविरत परिश्रमाबद्दल त्यांनी कौतुक केले. हर्षद माने या विद्यार्थ्यांची आदर्श विद्यार्थी म्हणून निवड करण्यात आली व त्याला गौरविण्यात आले. सेमी इंग्रजीच्या माध्यमातील विद्यार्थ्यांसाठी बोर्ड पॅटर्न वर आधारित तीन राऊंड मधील परीक्षेतील गुणानुक्रमे पहिल्या दहा क्रमांकाच्या गुणवंत विद्यार्थ्यांना शाळेकडून विशेष बक्षीस देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक नागोराव जोंधळे यांनी केले. यावेळी दोन्ही माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी शाळेमधील शिक्षकांच्या अध्यापनाविषयी व शाळेने व्यक्तिमत्व विकासासाठी घेतलेल्या उपक्रमांचा गौरव करणारी भाषणे केली. तसेच शाळेमध्ये मिळालेल्या जीवन शिक्षणाविषयीचे अनुभव कथन केले. शाळेतील गमतीजमती, शिक्षकांच्या काढलेल्या खोड्या, मित्र मैत्रिणी विषयीच्या भाऊक आठवणी सांगताना अनेक विद्यार्थ्यांचे डोळे पाणावले. आता यानंतर शाळेतील ' मस्ती की पाठशाला ' अनुभवता येणार नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपाली मुंडकर यांनी केले. कार्यक्रमाला दोन्ही शाळेतील विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फडणवीस यांचा सागर बंगला आमदार फोडण्याचे केंद्र-रोहित पवार

**पंढरपूर**-राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर हल्लाबोल केला आहे. फडणवीस यांचा सागर बंगलाबनला आमदार फोडण्याचे केंद्र बनला आहे अशी टीका रोहित पवारांनी केली. पंढरपूर तुतारी चिन्ह श्री विठ्ठल चरणी अर्पण करून रोहित पवार यांनी संतनामदेव महाद्वार येथे तुतारी फुंकून लोकार्पण केले. यावेळी ते बोलत होते.यावेळी रोहित पवार म्हणाले, ''फडणवीसांनी महाराष्ट्रातून एकता-समानता नष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्राची राजकीय परिस्थिती अन् संस्कृती खराब करण्यास फडणवीसचच जबाबदार आहेत. जातीवाद, धर्मवाद मोठ्या प्रमाणातवाढवला. सामान्य लोकांचे महत्त्वपूर्ण असणारे विषय बाजूला ठेवले. शेतकरी, गोर- गरीब यांचे प्रश्न न सोडवता सागर बंगला हा नेत्यांना वाचवण्यासाठी, आमदारांना फोडण्यासाठी,



कुटुंब फोडण्यासाठीचे केंद्र बनला आहे. या बंगल्यात सामान्य लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी काहीही प्रयत्न करीत नाहीत'', असे आरोप रोहित पवार यांनी केले.तसेच महाराष्ट्र राज्यात फुले - शाहू -आंबेडकर यांची तसेच संतांची परंपरा शरद पवार यांनी जपली आहे. तुतारीलाही अशीच परंपरा आहे. सामान्य लोकांच्या आनंदाच्या क्षणी आणि संघर्षाची सुरुवात करायची असेल तर तुतारी वाजवली जाते. येत्या निवडणुकीत लोक विरोधकांच्या तुताऱ्या वाजवतील, असेही यावेळी आमदार रोहीत पवार म्हणाले.याशिवाय ''अनेक नेत्यांनी भाजपचे प्रामाणिकपणे काम केले. सत्ता आल्यानंतर त्यांना मंत्रिपद मिळेल अशी अपेक्षा होती परंतु त्यांना मिळाले नाही, तर ज्यांच्यावर भ्रष्ट्राचाराचे आरोप केले त्यांनाच भाजपने पक्षात घेऊन पदे दिली. म्हणून महाराष्ट्रात भाजपचे अनेक निष्ठावंत नेते नाराज आहेत. लोकसभा निवडणूक होऊ द्या, हे नेते बाहेर पडतील'', असा दावाही रोहित पवारांनी केला.

# ज्येष्ठ गायक पंकज उधास यांचे निधन

**मुंबई**-आपल्या आगळ्या वेगळ्या गायकीसाठी केवळ भारतच नाही तर जगभरामध्ये ज्यांची ख्याती होती अशा पंकज उधास यांच्या निधनाच्या बातमीनं चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. त्यांच्या जाण्यानं भारतीय संगीतविश्वावर मोठी शोककळा पसरली आहे. आज सकाळी मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात त्यांचे निधन झाल्याचे वृत्त समोर आले आहे.

बॉलीवूडमध्ये गेल्या चार दशकांहून अधिक काळ पंकजींनी आपल्या गायकीनं वेगळी ओळख तयार केली होती. दीर्घ आजारानं त्यांची प्राणज्योत मालवली असून त्यांच्या निधनानंतर बॉलीवूडमधील अनेक सेलिब्रेटींनी पोस्ट करत त्यांना आदरांजली वाहिली आहे. ८० च्या दशकांत पंकजींनी त्यांच्या संगीत प्रवासाला सुरुवात केली होती. त्यानंतर तब्बल चार दशकांहून अधिक काळ ते संगीत विश्वात सक्रिय होते.पंकज उधास यांच्या कुटूंबियांकडून त्यांच्या निधनाची बातमी (रिपिझरक्ष णवहरी वशरींह पशुी) देण्यात आली असून त्यांनी त्याबाबत सोशल मीडियावर पोस्ट शेयर केली आहे. त्यामध्ये त्यांनी म्हटले (रिपिझरक्ष ींवहरी ीपस) आहे की, ते बऱ्याच दिवसांपासून एका दुर्धर आजाराचा सामना करत होते. आता पद्मश्री पुरस्कार प्राप्त पंकज उधास यांचे निधन झाल्याचे सांगताना आम्हाला कमालीचे दु:ख होत आहे.या सगळ्यात पंकजची हे नेमक्या कोणत्या आजारानं त्रस्त होते या विषयीची बातमी समोर आलेली नाही.

# मराठी राजभाषेचं जतन, संरक्षण व संवर्धन करणे सर्व मराठी माणसाची जबाबदारी आहे

**आपला भारत हा बहुभाषिक भाषेचा स्वरूपाने नटलेला देश आहेत. आपल्या बहुभाषिक भारताने आपल्या भाषा धोरणात त्रिभाषा सूत्राचा अवलंब केला आहेत. पण भारताला अजूनही राष्ट्रभाषा नसुन सुद्धा राष्ट्रभाषा म्हणून हिंदीला प्राधान्य, जागतिक व्यवहारासाठी इंग्रजीचा वापर आणि प्रांतिक व्यवहार हा राज्यभाषातूनच अशी भाषिक निती भारताने स्वीकारली आहे. राज्यकारभाराची व न्यायालयाची भाषा केंद्रात आणि राज्यात एकच असावे असे मत राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते. महाराष्ट्राच्या भाषिक प्रश्नाचा मागोवा घ्यायचा झाल्यास थोडा पूर्वोतिहास लक्षात घ्यायला हवा. मराठी भाषेचा अस्मितेचा व महाराष्ट्राचा प्रादेशिक जडणघडणीचा अनुबंध १३ व्या शतकातील महानुभावाचा वाड्मयापासुन विसावा शतकाचा उत्तरार्धतातील संयुक्त महाराष्ट्राचा आंदोलना पर्यंत पहायला मिळते.**

महाराष्ट्र शासन व्यवहारात मराठीचा वापर यादव काळा पासून होता. मात्र पुढे मुस्लीमानी राजवटीत फारशी ही राजभाषा झाली. त्यानंतर शिवकालीन पुन्हा मराठी राजभाषा झाली. छत्रपती शिवाजी महाराजांनी शासन व्यवहारातील संस्कृतीला मराठी प्रतिशब्द देणारा राज्य व्यवहार कोश तयार करून घेतला तसेच पत्र व्यवहाराच्या पद्धती सांगणारा लेखन कल्पतरू ग्रंथ ही सिद्ध करून घेण्यात आला त्यानंतर पेशवेकाळात शासन व्यवहारात मराठीचा वापर होत राहिली. तरी या मराठी वर फारशीचा गडद प्रभाव पडलेला दिसून येतो. १९६० साली महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. झाल्यानंतर स्थापन झालेल्या भाषा संचालनालयाने बहुतांश हेच सूत्र स्वीकारले दिसते मराठीची परिभाषा शक्यतो अखिल भारतीय परिभाषी जुळती असली पाहिजे. ही या मागील भूमिका होती. या भाषा संचालनालयाने राज्यातील विविध पदावर काम करणाऱ्या लोकांचे मुद्दे दर्शविणारा पदनामकोश प्रसिद्ध केला.

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर १ मे १९६६ पासून राजभाषा अधिनियम कायदा लागू झाला. व दोन स्वतंत्र अधिसूचना काढून महाराष्ट्र शासनाने मुंबई शहर वगळता इतरत्र दिवाणी व फौजदारी नायालयाची भाषा मराठी राहील व महत्त्वाच्या बाबीबाबत इंग्रजीचा वापर पूर्वीप्रमाणे चालू राहील असे घोषित केले. १ मे १९६० रोजी भाषावर प्रांतरचनेच्या तत्त्वानुसार मराठी भाषिकांचे महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. त्याचा सुवर्णमहोत्सवही राज्याने साजरा केला. पन्नास वर्षांत स्वातंत्र्य महाराष्ट्र राज्याचा निर्मिती मागील संकल्पनेची आणि स्व प्रांताची पूर्तता कितपत झाली हे पडताळून पाहायला हवे. शासन व्यवहारात मराठीचा वापर वाढविण्यासाठी महाराष्ट्राने स्वतंत्र भाषा संचालनालय स्थापन करून मराठी पदनाम कोश सिद्ध केला. पत्रव्यवहार मराठीतून होण्यासाठी नमुने विकास केले.



**संकेत कायरकर,**
**आनंदवन,वरोरा,जि.चंद्रपूर**
sahyandrinews@gmail.com

१ मे १९६६ पासून मराठी ही राजभाषा असून येथून पुढे राज्याचे सर्व प्रशासन मराठीतून होईल. व प्रशासन व्यवहार इंग्रजीचा वापर नाकारला जाईल. महाराष्ट्राचा सांस्कृतिक क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या कवी वि. वा. शिरवाडकर. उर्फ कुसुमाग्रज यांच्या २७ फेब्रुवारी असणारा जन्मदिवस हा राज्याची मराठी भाषा दिवस, अथवा मराठी भाषा गौरव दिवस दिन म्हणून महाराष्ट्रामध्ये साजरा करण्यात येतो. या मराठी भाषा गौरव दिनाच्या. पावर्शभूमीवर शासकीय कामकाज मराठीचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन मराठी भाषा विभागणे केला आहेत. मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने राज्यातील सर्व मंत्रालयीन विभाग आणि यांच्या अधिपत्याखाली कार्यक्रम अधिकाऱ्यांनी विविध उपक्रम राबवून हा दिवस साजरा करण्याचे आवाहन करण्यात आलेले आहेत. इतर भाषा शिकत असताना आपल्या मराठी भाषेचे महत्वसुद्धा टिकून राहणे गरजेचे आहे. मराठी भाषेचा जागर करून तिचे संवर्धन करण्याची जबाबदारी आता आपली आहे. मराठी भाषेतील साहित्यसंपदा विपुल आहे. आपली मराठी भाषा समृद्ध व्हावी तिचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी आपल्या सर्वांचे योगदान फार महत्वाची आहे. मराठी भाषा विभागाच्या वतीने दरवर्षी १४ ते २८ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येतो. या निमित्ताने मराठी भाषेच्या संवर्धनासाठी मराठी भाषा विभागाकडून घेण्यात आलेल्या काही महत्त्वपूर्ण निर्णय व उपक्रमांची माहिती देणारा विशेष लेख मराठी भाषा, साहित्य, संस्कृती आणि कला यांना एक दीर्घ परंपरा व स्वतंत्र ओळख आहे. महाराष्ट्राच्या या दीर्घ परंपरेचा उत्सव साजरा व्हावा, मराठी संस्कृतीला उजाळा मिळावा, अभिजात मराठी साहित्याचे श्रवण व्हावे, पारंपरिक कला अभिव्यक्त व्हाव्यात, उद्योग कल्पनांचे आदान-प्रदान व्हावे यासाठी भारतातील आणि भारताबाहेरील मराठी भाषिकांचे 'मराठी तितुका मेळवावा' विश्वसंमेलन मुंबई येथे अलीकडेच मराठी भाषा विभागाकडून आयोजित करण्यात आले होते. या विश्वसंमेलनाला जगभरातील मराठी प्रेमींकडून उत्स्फुत प्रतिसाद लाभला. मराठीच्या संवर्धनासह प्रचार प्रसारासाठी विभागाने काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत.जर आता आपण विषयाच्या अनुषंगाने जर बोलतो म्हटलं तर मराठी भाषा समोर अनेक अडचणी व आव्हाने आहेत. प्रदीर्घ काळापासून मराठी वर खूप सारे अन्याय होत आहेत. अर्थात आपल्याच महाराष्ट्रात हाल सोसते मराठी याकरता मराठी प्रेमी व संघटना रस्त्यावर उतरले आहेत. मराठी भाषेला कुठेही धक्का न बसता तिथे जतन संवर्धन कायम राहावे यासाठी धळपळत आहेत. व मराठी भाषा मंत्रालय सुद्धा या करता कटिबंध आहेत पण अजूनही मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला नाहीत हे अजूनही खंत दुर्दैवी बाब महाराष्ट्र व मराठी भाषेला आहेत. भारतीय संविधान कलम ३४ (अ) राजभाषा अधिनियम कायदा लागू असुन महाराष्ट्रात मराठीचा पाट्या लागावा याकरता सर्वोच्च न्यायालयाने आदेश काढला तरी पण अनेकांचे त्याकडे दुर्लक्ष आहेत.

मराठी भाषेला महान असा इतिहास लाभलेला आहे. मराठी भाषा ही प्रबोधनाची भाषा आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या काळापासून तर अगदी आधुनिक काळापर्यंत मराठी भाषा समृद्ध आणि संपन्न आहे. मात्र सध्याच्या जागतिकीकरणाच्या आणि विज्ञान युगात मराठी राजभाषेवर काही परकिय भाषांचे अतिक्रमण वाढत आहे कि काय असे वाटू लागले आहेत. आपण समाजात विविध ठिकाणी वावरत असताना काही परप्रांतीय महाराष्ट्रात असतात पण ते आपली स्वतःची मातृभाषा सोडून बोलत नाही ते हिंदीतच बोलतात. व आपण सुद्धा एक प्रदीर्घकाळ महराष्ट्राचा रहिवासी असुन त्या परप्रांतीया समवेत हिंदी भाषेत बोलतो व त्या समवेत इम्प्रेशन पडण्यासाठी आपण अधे - मधे इंग्रजी बोलत असतो. परंतु इंग्रजी व हिंदी कितीही बोलली तरी ठेच लागतातच मग आपले पाऊल आपल्या आईकडे परत येतात म्हणजे ती आपली मातृभाषा मराठी.

या परकिय भाषेच्या आक्रमणातुन मराठी भाषेचा अधिक प्रचार, प्रसार, प्रसिध्दी व संवर्धन होणे आवश्यक आहे. या करीता मराठी माणसाने मराठी भाषेचा, साहित्याचा, कविता इत्यादी च्या अभिमान बाळगायला हवा, असे मी स्वतः माझ्या महराष्ट्रातील मराठी माणसाला आवाहन करतो

# ऐतिहासिक सोहळा: परळीतून एकवटली राज्यातील 'ब्रह्मशक्ती'; ब्राह्मण ऐक्य परिषदेला अलोट गर्दी

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

ब्राह्मण समाजाचे या देशाच्या जडणघडणीत आणि संस्कृती रक्षणामध्ये मोठे योगदान असून ब्राह्मण समाज हा अन्य सर्व समाजांना दिशा देणारा समाज आहे. ब्राह्मण समाजाने ऐक्य परिषदेच्या माध्यमातून ज्या मागण्या मांडल्या. त्या सरकारमधील एक जबाबदार मंत्री म्हणून सरकारच्या वतीने या सर्व मागण्या सोडवण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली. तर ब्राह्मण समाजाचा प्रत्येक संकल्प व मागण्यांसाठी मी सदैव समाजासोबत आहे अशी ग्वाही माजी मंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिली. परळीत आयोजित ऐक्य परिषद ऐतिहासिक ठरली. या परिषदेत परळीतून ब्रह्मशक्ती एकवटल्याचे चित्र दिसून आले. या ऐक्य परिषदेला अलोट गर्दी झाली होती.





पंचम ज्योतिर्लिंग क्षेत्र परळी वैजनाथ येथून सकल ब्राह्मण ऐक्याचा 'हुंकार' पुकारण्यात आला. परळी वैजनाथ येथे आज २५ फेब्रुवारीला राज्यस्तरीय ब्राह्मण ऐक्य परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.संपूर्ण दिवस संघटनात्मक व प्रबोधनात्मक भरगच्च कार्यक्रम झाले.प.पू. सुधीरदास महंत (काळाराम मंदिर, नाशिक), धर्मगुरु प.पू.अमृताश्रम स्वामी महाराज, यांचे आशीर्वाचन या परिषदेला लाभले तर राज्याचे कृषीमंत्री ना.धनंजय मुंडे, भाजप राष्ट्रीय सचिव माजी मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते या ऐक्य परिषदेचे उद्घाटन झाले. यावेळी आमदार नमिता ताई मुंदडा यांची प्रमुख उपस्थिती होती यया ऐक्य परिषदेसाठी संत-महंतांचे आशीर्वच व विविध क्षेत्रातील दिग्गजांनी मार्गदर्शन केले. राज्यातून सकल ब्राह्मण समाज हजारोंच्या संख्येने एकवटला होता. न भूतो न भविष्यती अशी ब्राह्मण समाजाची ही ऐक्य परिषद ठरली. या ऐक्य परिषदेत समाजाच्या वतीने विविध ठराव ही मंजूर करण्यात आले. मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहणाने या परिषदेला प्रारंभ झाला. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज प्रभू वैद्यनाथ व भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन करून या परिषदेचे उद्घाटन झाले. यावेळी प्रास्ताविकपर बीजभाषण परिषदेचे स्वागताध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी यांनी करताना ब्राह्मण समाजासमोरील आजच्या स्थितीतील विविध प्रश्न, समस्या व शासन दरबारी समाजाच्या न्याय मागण्या याबाबतीत मुद्दे उपस्थित केले. या कार्यक्रमात मान्यवरांच्या शुभहस्ते राज्यस्तरीय प्रेरणा पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्याचबरोबर विविध क्षेत्रात राज्यभरात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा जीवन गौरव, वैद्यनाथ भूषण, ब्रह्मविभूषण, ब्रह्मभूषण, मनस्विनी ब्रह्मश्री व ब्रह्म अर्जुन अशा वर्गवारीत गौरव करण्यात आला.

याप्रसंगी पुढे बोलताना कृषिमंत्री ना. धनंजय मुंडे यांनी आपले सविस्तर मनोगत व्यक्त केले. ब्राह्मण सभाज हा अतिशय सुसंस्कृत समाज असून अन्य सर्व समाजाला दिशादर्शक अशा प्रकारची जबाबदारी या समाजाची आहे. ब्राह्मण ऐक्य परिषद या व्यासपीठावरून केवळ ब्राह्मण समाजाच्या हिताचाच नव्हे तर राष्ट्रहिताचा विचार रुजवला जाणार असल्याचा विश्वास आपल्याला वाटतो .आपली जडणघडण ही संपूर्णतः ब्राह्मण समाजातूनच झाली असून ब्राह्मण समाजाशी आपण एकरूप असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. ब्राह्मण समाजाच्या हितासाठी काही मागण्या समाजाच्या व्यासपीठावरून करण्यात आल्या त्या न्याय मागण्या सरकारकडून नक्कीच सोडवल्या जातील. यासाठी मी सरकारच्या वतीने कटिबद्ध असल्याचे ना. धनंजय मुंडे यांनी सांगितले. तर माजी मंत्री पंकजाताई मुंडे यांनी अतिशय आत्मीय भावना व्यक्त करत ब्राह्मण समाजात राष्ट्र उन्नतीचे सामर्थ्य असून लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांचा सकल समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठीचा जो विचार आहे तो पुढे घेऊन जात आपण सदैव प्रयत्न करत असतो. ब्राह्मण समाजाने ऐक्यातून उन्नती या सूत्रामधून स्वजनांच्या हिताचा विचार तर केलाच आहे मात्र या सूत्रातून अन्य वंचित, उपेक्षित, दुर्लक्षित अशा सर्व समाज घटकांच्या उन्नतीचाही विचार ब्राह्मण समाज सदैव करत आला असून या ऐक्य परिषदेच्या माध्यमातूनही तोच विचार ब्राह्मण समाज नक्की करेल असा विश्वास आहे. हा राष्ट्र उत्थानासाठी अग्रेसर असणारा समाज असून या समाजाच्या सर्व संकल्प व मागण्यांमध्ये आपण सदैव सोबत असल्याची ग्वाही पंकजाताई मुंडे यांनी दिली.या कार्यक्रमात भागवताचार्य व प्रसिद्ध वक्ते स्व. वा.ना उत्पात स्मृती प्रेरणा पुरस्कार, राष्ट्रीय कीर्तनकार स्व. भरतबुवा रामदासी स्मृती प्रेरणा पुरस्कार व महाराष्ट्राच्या प्रसिद्ध वक्त्या रणरागिनी स्व.ड. अपर्णाताई रामतीर्थकर स्मृती प्रेरणा पुरस्कार अनुक्रमे डॉ. मंजुषाताई कुलकर्णी, दाते पंचांगकर्ते मोहन दाते, सौ. उज्वलाताई गौड -शर्मा यांना प्रदान करण्यात आले या ऐक्य परिषदेत सुशील कुलकर्णी (संपादक, नालायजर) , विवेक देशपांडे (प्रथितयश उद्योजक) ब्राह्मण संघर्षकन्या केतकी चितळे (प्रसिद्ध सिनेअभिनेत्री) पंचांगकर्ते श्री मोहन दाते , डॉ. मंजूषाताई कुलकर्णी (प्रशासकीय अधिकारी, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई,) , उज्वला जितेंद्र शर्मा-गौड (अध्यक्षा-रणरागिणी महिला मंच, पुणे) श्री. सुरेंद्र चतुर्वेदी, उज्जैन (राष्ट्रीय अध्यक्ष ब्राह्मण महासभा) प्रा. महेश पाटील (शिक्षणतज्ञ) ,श्री. भूषण धर्माधिकारी (संचालक- ध्रुव ख-ड कॅडमी, मुंबई) श्री. विवेक कुंभेजकर (संस्थापक अध्यक्ष ब्रह्म ग्रो) ,प्रा. दीपक कासराळकर (प्रसिद्ध व्याख्याते) श्रीपाद कुलकर्णी (संस्थापक अध्यक्ष इइछत्र) प्रा. डॉ. विजय पाटील (प्रसिद्ध वक्ते मुंबई) यांचे मार्गदर्शन झाले. परळीतील या ब्राह्मण ऐक्य परिषदेला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून ब्रह्मवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुंबई, कोकण ,विदर्भ ,उत्तर महाराष्ट्र ,मराठवाड्यासह विविध भागातून ब्राह्मण समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ब्राह्मण समाजातील राज्य स्तरावरील सर्व संघटनांचे संमेलन करून ब्राह्मण ऐक्याची प्रतिज्ञा सर्वांना देण्यात आली. संपूर्ण दिवसभर प्रबोधनात्मक व संघटनात्मक विषयावर चर्चा झाली. या ऐक्य परिषदेच्या यशस्वीतेसाठी स्वागताध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांच्या नेतृत्वाखाली परळीतील सकळ ब्राह्मण समाजाने अथक परिश्रम घेतले.

**ब्राह्मण समाज ऐक्य परिषदेतील ठराव...**

१) मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत मंजूर करण्यात आलेले परशुराम आर्थिक विकास महामंडळ तात्काळ कार्यान्वित करुन भरीव आर्थिक निधी द्या..

२) ब्राह्मण समाजाच्या जमिनीवरील अतिक्रमणासाठी व ब्राह्मण समाजातील व्यक्तीचे होणारे सामाजिक विडंबन बाबत विशेष संरक्षण कायदा पास करावा

३) मुलीच्या मोफत शिक्षणाच्या निर्णयाचे स्वागत.. पण मुलांनाही मोफत शिक्षणाची मागणी व उच्च शिक्षण व व्यावसाईक अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती मिळावी

४) ईनामी जमिनी बाबतीत वर्ग ३ व २ मधून १ मध्ये वर्ग करावेत व मालकी हक्कात नाव घ्यावे

५) ब्राह्मण समाजाच्या कुळ कायद्याचे पुनर्वावलोकन व्हावे.

६ . विनोबाजी भावे यांच्या भूदान चळवळीत जमिनी दान दिलेल्या ज्या पडीक जमिनी तशाच पडून आहेत त्या जमिनी मूळ मालकांना परत करण्यासाठी विशेष कायदा पारित करावा

७. ब्राह्मण पुरोहित वर्गासाठी मानधन योजना सुरू करावी

८. वेद विद्यालयांना अनुदान व कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम ब्राह्मण समाजातील मुलांसाठी मोफत करावेत

९.ब्राह्मण समाजातील महिलांच्या लघुउद्योग व गृह उद्योगासाठी मायक्रो फायनान्स शून्य टक्के दराने कर्ज योजना मंजूर करावी

१०. स्वातंत्र्यवीर सावरकरांना भारतरत्न पुरस्कार द्यावा.

११.वेद विद्यालयांना अन्य शाळांप्रमाणे शासकीय अनुदान मंजूर करून कर्मचारी भरती करण्यास मंजुरी द्यावी

# सायखेडा येथे पोर्णिमेच्या निमित्ताने महाबुध्दवंदना कार्यक्रम संपन्न

**सोनपेठ | प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजे सायखेडा येथे हौसाबाई बाबुराव उजगरे यांच्या वतीने दि.२४ फेब्रुवारी २०२४ रोजी सायंकाळी पौर्णिमेच्या अनुषंगाने महाबुध्दवंदना कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते यावेळी या कार्यक्रमांची सुरुवात विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर तसेच तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून दिप प्रज्वलन करून करण्यात आली महामानव यांच्या प्रतिमेचे पुजन बाबुराव उजगरे उपसरपंच सायखेडा,पत्रकार कल्याण वाघमारे, यांच्या हस्ते करुन अभिवादन करण्यात आले त्यानंतर सामूहिक त्रिशरण, पंचशील , समाज बांधवांनी ग्रहण केले तसेच दि.२६ फेब्रुवारी २०२४ रोजी नुतन ग्राउंड जिंतूर रोड परभणी येथे होतं असलेल्या अँड प्रकाश आंबेडकर यांच्या मार्गदर्शनात ओ.बी.सी भटक्या विमुक्त एल्गार सभेला जास्तीत जास्त समाज बांधवांनी उपस्थित रहाण्यांचे प्रेम उजगरे यांनी बोलताना आव्हान केले तसेच या महाबुध्दवंदना कार्यक्रमाला हौसाबाई उजगरे, त्रिशाला उजगरे,सुलोचना उजगरे,मंडुबाई उजगरे,अनिता उजगरे, आम्रपाली उजगरे, शांताबाई उजगरे,माया उजगरे, रेणुका उजगरे, आशाबाई उजगरे, धम्म शिला उजगरे, संगिता व्हावळे, गयाबाई हातागळे, बायनाबाई भालेराव, कविता उजगरे, रुक्मिणी सावंत, कौसाबाई उजगरे, भाग्यश्री हातागळे, जनाबाई मिसाळ,आदी महिला पुरुषांचा मोठ्या प्रमाणात कार्यक्रमात सहभाग होता.



महाबुध्दवंदना कार्यक्रमाला यशस्वीतेसाठी बुवाजी उजगरे , बाबुराव उजगरे,प्रेम उजगरे, महेश उजगरे यांनी परिश्रम घेतले तसेच कार्यक्रमाच्या शेवटी बौद्ध विहाराच्या प्रांगणात खिरदानचा कार्यक्रम संपन्न झाला.

# हिदायत्तुल कुराण मकतब मध्ये जलसा कार्यक्रम संपन्न

**कौसडी | प्रतिनिधी**

जिंतूर तालुक्यातील कौसडी येथील मरकज मस्जिद हिदायत्तुल कुराण मकतब मध्ये दिनांक २५ फेब्रुवारी शनिवार रोजी रात्री ८:३० वाजता जलसा-ए-आम ( वार्षिक स्नेहसंमेलन ) कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती म्हणून मौलाना अब्दुल जलील ताबिश मिल्ली व मौलाना तजमूल अहमद खान ताबिश मिल्ली हे होते. तर मंचावर मुफ्ती लुखमान खान, मौलाना उस्मान, मौलाना अनीस खान, मौलाना अब्दुल हाफिज, मौलाना इरफान, हाफेज शकील, मौलाना अजमत खान, मौलाना सय्यद इरफान, मौलाना बिलाल शेख, मौलाना इरशाद, मौलाना नईम कुरेशी हे उपस्थित होते.



कार्यक्रमात मौलाना अब्दुल जलील ताबिश मिल्ली यांनी उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन करताना सांगितले आपल्या मुलांना धार्मिक शिक्षण देणे गरजेचे आहे. प्रत्येक मुस्लिम व्यक्तींनी इस्लाम धर्माचे नियम व अटीचे पालन करावे. मुस्लिम समाज बांधवांनी मुस्लिम महापुरुषांचे आदर्श घ्यावे व त्यांनी दाखवलेल्या वाटेवर चालावे असे ते बोलत होते. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की सध्या सोशल मीडियावर इंस्टाग्राम फेसबुक व्हाट्सअप ने धुमाकूळ घातले आहे. त्यामुळे मुस्लिम महिला व मुली चुकीच्या वाटेवर जातानी दिसत आहे. मुली जेव्हा शिक्षणासाठी कॉलेज शाळेमध्ये जातात त्यावेळेस पालकांनी त्यांच्यावर लक्ष ठेवणे गरजेचे आहे. प्रत्येक पालकांनी आपल्या पाल्यावर चांगले संस्कार दिले पाहिजे असे ते म्हणत होते. यावेळी मौलाना तजमूल अहमद खान मिल्ली यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले. हिदायतुल कुराण मकतब मध्ये शिक्षण घेणाऱ्या मुला मुलींनी उपस्थित मान्यवर व नागरिकांसमोर नातेपाक, कुराण व हादिस ची माहिती सांगितली. मान्यवरांच्या हस्ते या मुला-मुलींना रोक बक्षिसे व शालेय साहित्य वाटप करण्यात आले. हे कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी साजिद खान, अन्वर पटेल, समीर पठाण, शेख जुनेद यांच्यासह मुस्लिम तरुण युवकांनी परिश्रम घेतले होते.

# दिमाखदार तालुकास्तरीय पारितोषिक वितरण व गुणगौरव सोहळा संपन्न

**जिंतूर | प्रतिनिधी**

दि. २३/०३/२०२४ रोजी श्री राधाकृष्ण मंगल कार्यालय, जिंतूर येथे तालुकास्तरीय पारितोषिक वितरण तथा गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. वरिष्ठांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाने आणि जिंतूर तालुक्यातील सर्वांच्या सहकार्याने तालुक्यातील सर्व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य होण्याच्या हेतूने.... दर्जेदार पोषण आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण या ध्येयावर वाटचाल करण्यासाठी वैविध्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या सर्व उपक्रमांना तालुक्याने उदंड प्रतिसाद दिला. यामध्ये हिरीरीने आणि उत्साहाने सहभाग घेऊन विजयी झालेल्या आणि उत्साहाने सहभाग घेतलेल्या सर्वांचा या कार्यक्रमात गुणगौरव करण्यात आला.या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी डायट परभणीचे प्राचार्य विकास सलगर, तहसीलदार राजेश सरवदे, नायब तहसीलदार प्रशांत राखे, गटशिक्षणाधिकारी त्र्यंबक पोले, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मंगेश नरवाडे, तालुकास्तरीय पारितोषिक वितरण व गुणगौरव सोहळा यासाठी विशेष सहकार्य करणारे रमेश दरगड, सन्मानचिन्ह उपलब्ध करून देणारे संदीपआप्पा लकडे, या कार्यक्रमासाठी आपले भव्य श्री राधाकृष्ण मंगल कार्यालय उपलब्ध करून देणारे कार्यालयाचे सर्वेसर्वा कैलासराव आदमाने, अल्पोपहार व्यवस्था करून देणारे ब्रिजगोपाल तोष्णीवाल, सन्मानपत्र उपलब्ध करून देणारे लक्ष्मीकांत टाले उपस्थित होते.या कार्यक्रमात सर्व विजयी स्पर्धकांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र मान्यवरांच्या हस्ते सन्मानाने प्रदान करण्यात आले. . सहभागी सर्व स्पर्धकांना सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. या सर्व उपक्रम व स्पर्धांमध्ये ज्या अधिकारी, कार्यालयीन कर्मचारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक, शालेय पोषण आहार स्वयंपाकी, मदतनीस, सेवक या सर्वांनी महत्वाचे योगदान दिले त्या सर्वांचा सन्मान करण्यात आला. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान यामध्ये तालुकास्तरावर प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या शाळा, केंद्र स्तरावर प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या शाळा यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. शाळेच्या समृद्धतेसाठी ग्रामस्थ, पालक, दानशूर व्यक्ती यांच्याकडून देणगी स्वरूपात लोकसहभाग प्राप्त करणाऱ्या शाळेचा, दानशूर व्यक्तीचा, शाळा व्यवस्थापन समितीचा, मुख्याध्यापक व शिक्षकांचा यथोचित सन्मान करण्यात आला. . तालुकास्तरावर शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी आणि स्पर्धा परीक्षांसाठी आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय विशेष मार्गदर्शन तासिकेमध्ये मार्गदर्शन करणाऱ्या तज्ञ सुलभकांचा आणि ऑनलाईन प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देणाऱ्या ग्यानप्रकाश फाउंडेशनच्या सर्व सदस्यांचा गुणगौरव करण्यात आला. एकंदरीत संपूर्ण कार्यक्रमात जिल्हास्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धा, कोजागिरी पौर्णिमेनिमित्त आयोजित केलेले शिक्षकांचे कवी संमेलनात सहभागी झालेले कवी, विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमामध्ये सहभागी झालेले प्रतिभासंपन्न शिक्षक, उपक्रमशील शिक्षक, अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन प्रशिक्षणाचे सुलभक असणारे शिक्षक, यांच्यासह गुणवत्ता विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असलेल्या अनेक शिक्षक बांधवांचा यथोचित सन्मान करण्यात आला. तालुकास्तरावर घेण्यात आलेले विज्ञान प्रदर्शन, नवोदय सराव परीक्षा, चित्रकला, निबंध, वक्तृत्व, कबड्डी, खो-खो, वैयक्तिक नृत्य, सामूहिक नृत्य, वैयक्तिक गीतगायन, लघु नाटिका या स्पर्धेमध्ये विजयी झालेले स्पर्धक आणि सहभागी झालेले स्पर्धक यांनाही गौरविण्यात आले.एकंदरीत जिंतूर तालुक्याच्या शिक्षण क्षेत्रामध्ये अतिशय भव्य-दिव्य आणि दिमाखदार सोहळा सर्वांना अनुभवता आला याबद्दल वरिष्ठ कार्यालयाने जिंतूर तालुक्याचे विशेष कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवी मयूर जोशी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी केशव घुगे, मनोज तोडकर, तुकाराम चव्हाण, दिनकर चौधरी, प्रकाश चव्हाण, मधुकर घनसावंत, सुनील शंकपाळे, राम आडे, डी. जी. पोले, पांडुरंग भांबळे, मारोती घुगे, दिनकर घुगे, शंकर चव्हाण, राजेंद्र ढाकणे, चंद्रकांत मानवते, लक्ष्मण टाकणसार, विकास सातभाई, विष्णु शिंदे, शंकर माने, जयानंद मत्रे, शिवाजी तेकुलवार, भास्कर मुंडे, अनिल स्वामी, माधव गडदे, रवींद्र राठोड, हनुमान गायकवाड, सुनील फड, योगिता संगवई, रत्नमाला तोडकर यांच्यासह संपूर्ण जिंतूर तालुक्यातील शिक्षण विभागाच्या कुटुंबातील सर्व सदस्यांनी मेहनत घेतली.



# कायदा व सुव्यवस्थेत चंद्रपूर राज्यात अग्रेसर राहावा

# कायदा सुव्यवस्था राखण्यात पोलिसांप्रमाणेच नागरिकांचाही सहभाग महत्त्वाचा-ना.मुनगंटीवार

## गाव पातळीवर पोलीस पाटील यांच्यावर मोठी जबाबदारी

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

शहरात सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस प्रशासन पूर्णपणे प्रयत्नशील आहे. शहरातील कायदा व सुव्यवस्था सांभाळण्यासाठी पोलिसांप्रमाणेच नागरिकांचाही सहभाग महत्त्वाचा असून कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत चंद्रपूर जिल्हा राज्यात अग्रेसर राहावा, अशी अपेक्षा राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली. पोलीस परेड ग्राउंड येथे आयोजित पोलीस एक्स्पो कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाला आमदार किशोर जोरगेवार, जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक रीना जनबंधू, विधी सेवा प्राधिकरणचे सचिव सुमित जोशी, शिक्षणाधिकारी(माध्य.) कल्पना चव्हाण आदी उपस्थित होतेसमाजामध्ये पोलीस आदर्श नागरिक असून समाजाचे रक्षण करण्याची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर असते. असे सांगून पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, पोलिसांप्रमाणेच कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी नागरिकांची देखील आहे. आदर्श गाव होण्यासाठी तसेच गाव पातळीवर किंवा त्यांच्या कार्यक्षेत्रातील गुन्हे रोखण्यासाठी पोलीस पाटील हा महत्त्वाचा घटक आहे. समाज व पोलीस पाटील यांच्या समन्वयातून महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांपैकी चंद्रपूर जिल्हा कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत अग्रेसर व्हावा, इतरांनी या जिल्ह्याच्या प्रशासनाचा हेवा करावा, पोलीस विभागाचे कौतुक करावे असे काम जिल्ह्यात व्हावे. नवचैतन्य प्रदर्शनीतून गावातील प्रत्येक नागरिकांपर्यंत चैतन्य पोहोचवायचे आहे. पोलीस विभागाला भौतिक संसाधनाची आवश्यकता असल्यास त्या सर्व संसाधनासाठी निधी उपलब्ध करून देणार असल्याचे ते म्हणाले.पुढे बोलतांना ना. मुनगंटीवार म्हणाले, सर्वंकष समाजाच्या प्रगतीसाठी एकत्र येऊन सामूहिक भावनेने विचार करण्याची आवश्यकता आहे. कायद्याची अंमलबजावणी कठोरपणे करावी. जेणेकरून, कायदा तोडण्याची हिंमत कोणीही करणार नाही. त्यासाठी जिल्ह्यात व्यवस्था उभी करण्याची आवश्यकता आहे. या प्रदर्शनीच्या माध्यमातून व्यसनमुक्ती संदर्भात जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला. जिल्ह्यात दारूबंदी असताना अपघातात १३१ लोकांचा तर दारूबंदी उठविल्यानंतर ४५० लोकांचा मृत्यू झाला. व्यसनमुक्तीचा संकल्प केला मात्र, संकल्प करून पुढे न जाता व्यसनमुक्तीची चळवळ जिल्ह्यात उभी करावी. नशा ही दारू, व्यसनाची नसावी तर ती उत्तम गुणांची असावी, असेही ते म्हणाले.अर्थमंत्री असताना पोलीस पाटील यांचे मानधन वाढवून दिले. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांचे पर्यंत त्यांच्या असलेल्या मागण्या पोहोचविण्यात येईल. पोलीस पाटील यांनी जनतेचे विषय घेऊन आपला जिल्हा महाराष्ट्रात उत्तम व्हावा, या दृष्टीने प्रयत्न करावे तर जिल्हा नेहमी अग्रेसर राहावा हा भाव घेऊन कार्य करावे. असेही ते म्हणाले.यावेळी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी नवचैतन्य प्रदर्शनीच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल पोलीस अधिक्षक मुमक्का सुदर्शन यांचे कौतुक केले



### पोलीस पाटील मार्गदर्शिकेचे अनावरण

“ पोलीस प्रशासनाकडून तयार करण्यात आलेल्या पोलीस पाटील मार्गदर्शकेचे अनावरण पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते पार पडले.

# नैसर्गिक व सहज-सुलभ जीवनशैलीमुळे मानवी अस्थिना बळकटी-डॉ.प्रसाद जोशी

**सांगोला | प्रतिनिधी**

मानवी शरीरातील विशेषतः ज्येष्ठ नागरिकांमधील हाडांचा ठिसूळपणा ही एक जागतिक समस्या बनली असून सोप्या घरगुती उपायाने व सकारात्मक जीवनशैली मुळे हाडाची मजबुती टिकवून ठेवता येवू शकते, असे विचार फलटण येथील जोशी हॉस्पिटलचे संचालक डॉ.प्रसाद जोशी यांनी व्यक्त केले.सांगोला शहरातील श्री सिद्धी विनायक महिला ज्येष्ठ नागरिक संघ व धनगर समाज सेवा महिला मण्डल सांगोला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मोफत अस्थी - चिकित्सा.शिबिरात मार्गदर्शन करताना डॉ जोशी बोलत होते.सांगोला शहरातील नगरपालिका बचतगट इमारतीत रविवारी सदर शिबिर संपन्न झाले.या वेळी महिला ज्येष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षा आशा सलगर,सचिव वर्षा इंगोले, यांच्यासह कार्यक्रमाचे पाहुणे म्हणून माजी लोकनियुक्त नगराध्यक्षा राणी माने,स्वाती मगर, महिला सूत गिरणी चेअरमन कल्पना शिंगाडे, माजी प्राचार्य डॉ कृष्णा इंगोले, ह भ प माऊली ऊर्फ कृष्णाजी इंगोले आदि उपस्थित होते.



आपल्या मार्गदर्शन व्याख्यानात डॉ.जोशी यांनी दररोज किमान अर्धा तास कोवळ्या उन्हात बसून राहिल्यास व सकारात्मक,आनंदी जीवन अंगिकारली तर ज्येष्ठ नागरिकांना ओशध - गोळयाची गरज लागणार नाही,असे सांगितले.त्याच प्रमाणे हाडांची ठीसुळता,त्याची लक्षणे,कारणे,उपाय,प्रमाण यावर भाष्य केले.हाडे ठिसूळ झाल्यास कोणती काळजी घ्यावी,आहार कसा असावा,कॅल्शिअम प्रमाण किती असावे,प्रतिबंधात्मक उपाय कोणते यावर सविस्तर मार्गदर्शन केले.शिबिरात उपस्थित असलेल्या सत्तर ते पंचाहत्तर ज्येष्ठ नागरिकांची तपासणी करून त्यांना मार्गदर्शन केले. गुढगा,शस्त्रक्रिया,संभाव्य खर्च यावर भाष्य करताना योग,प्राणायाम,व्यायाम व आनंदी वृत्ती जोपासण्याचे आवाहन शेवटी त्यांनी केले.कार्यक्रमात प्रास्ताविक व स्वागत आशा स्लगर यांनी तर आभाप्रदर्शन डॉ कृष्णा इंगोले........यांनी केले

# सांगोला सांगोला विद्यामंदिर प्राथमिक विद्यालयात संत गाडगेबाबा महाराज यांची जयंती साजरी

**सांगोला | प्रतिनिधी**

सांगोला विद्यामंदिर प्राथमिक विद्यालयात संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस विद्यालयाचे प्र.मुख्याध्यापक उदय बोत्रे यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. या वेळी विद्यालयातील सहशिक्षिका वैशाली पाटील यांनी संत गाडगेबाबा यांच्या जीवनावर माहिती सांगितली. संत गाडगे महाराज यांचे मूळ नाव डेबुजी असे होते. त्यांचा वेश म्हणजे अंगावर फाटकी गोधडी व हातात गाडगे व झाडू असा होता, म्हणून त्यांना गाडगेबाबा असे संबोधले जाऊ लागले. त्यांनी घर सोडून तीर्थयात्रा करत समाजातील अज्ञान, अनिष्ट रुढी, परंपरा चालीरिती दूर करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी निरपेक्ष लोकसेवा केली असे मत



व्यक्त केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सहशिक्षिका रेश्मा बनसोडे यांनी केले तर आभार सहशिक्षक अविनाश दिघे यांनी मानले.

# शिंदे-जरांगेंतील संभाषण जाहीर करा:कॉंग्रेसचे सरकारला आव्हान

**मुंबई**-मराठा आरक्षणावर प्रश्नावर शिंदे फडणवीस पवार सरकारने फसवणूक केली आहे. त्यांनी आरक्षणाच्या नावाखाली महाराष्ट्र पेटवण्याचे पाप केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचाराला काळीमा फासला आहे. कोणाच्याही आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देऊ असे सांगत कुणबी प्रमाणपत्र वाटून ओबीसी आरक्षणाला धक्का लावला. महाराष्ट्रात नेमके काय चालले आहे? हे सरकारला स्पष्ट करावे लागेल आणि हिम्मत असेल तर मुख्यमंत्री व जरांगे पाटील यांच्यात काय चर्चा झाली? ते जाहीर करा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.



अधिवेशनच्या पहिल्याच दिवशी सरकारवर तोफ डागत कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, मराठा आरक्षण मविआ सरकारने टिकवले नाही असा आरोप सरकारमधले लोक करत आहेत परंतु मविआ सरकार असताना मराठा आरक्षण उपसमितीत एकनाथ शिंदे, अशोक चव्हाण होते, अजित पवारही त्या सत्तेत होते. मराठा आरक्षण मविआ सरकार टिकवू शकले नाही तर त्याला हे लोकही जबाबदार नाहीत का? आज हेच एकमेकांच्या मांडीला मांडी लावून बसलेत व खापर मात्र मविआ सरकारवर फोडत आहेत.मराठ्यांची बाजू मांडू नये असे देवेंद्र फडणवीस यांनीच सांगितले होते असे तत्कालीन महाधिवक्ता आशितोष कुंभकोणी यांनी सांगितले आहे, त्यामुळे झारीतील शुक्राचार्य कोण, हे समोर आले आहे. आता आरोप प्रत्यारोप, जाहिरातबाजी बंद करा, जनतेच्या पैशाची उधळपट्टी बंद करा आणि शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचाराला काळिमा फासण्याचे काम केले त्यावर स्पष्टीकरण द्या. वस्तुस्थिती काय आहे, हे सांगण्याची सरकारची जबाबदारी आहे आणि आम्ही त्यासाठी सरकारला धारेवर धरु, असे नाना पटोले म्हणाले.

# आंदोलनाचा उद्देश आरक्षण आहे की राजकारण? कोण कोणाची तुतारी वाजवतोय हे महाराष्ट्राला कळाले; शिवसेनेचा शरद पवारांवर निशाणा

**मुंबई**-मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या माध्यमातून कोण कोणाची तुतारी वाजवत आहे? हे महाराष्ट्राला कळाले असल्याचे टीका शिवसेनेच्या राज्य प्रवक्त्या ज्योती वाघमारे यांनी केली आहे. मनोज जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर केलेल्या आरोपानंतर शिवसेनेकडून जरांगे यांच्यावर प्रतिहल्ला करण्यात आला आहे. आंदोलनाचा उद्देश आरक्षण आहे की, राजकारण आहे? याचा विचार आता मराठा बांधवांनी आणि महाराष्ट्राने करावा, असे आवाहन देखील त्यांनी केले.

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांनी काल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर अनेक गंभीर आरोप केले होते. त्यानंतर समाज माध्यमांवर जरांगे यांच्यावर जोरदार टीका झाली. सत्ताधारी पक्षाच्या वतीने देखील मनोज जरांगे पाटील यांच्या आरोपांना प्रत्युत्तर देण्यात आले आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला राजकीय वास असल्याचा आरोप शिवसेनेकडून करण्यात आला आहे. शिवसेनेच्या राज्य प्रवक्त्या ज्योती वाघमारे यांनी या प्रकरणावरून शरद पवार यांच्यावर देखील निशाणा साधला आहे. कोण कोणाची तुतारी वाजवत आहे? हे संपूर्ण महाराष्ट्राला कळून चुकलं असल्याचं ज्योती वाघमारे यांनी म्हटलं आहे.मराठा आरक्षणासंदर्भात राज्य सरकार पहिल्यापासून सकारात्मक आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री असताना देखील दोन वेळा मनोज जरांगे पाटील यांना भेटायला गेले होते. आता सरकारच्या वतीने त्यांच्या सर्व मान्य पूर्ण करण्यात आल्या आहेत. मात्र, असे असताना देखील आंदोलनाची भाषा होत असेल तर आंदोलनाचा उद्देश हा मराठा आरक्षण आहे की, राजकारण आहे? याचा विचार आता सर्व मराठा बांधवांनी आणि महाराष्ट्राने करावा, असे आवाहन ज्योती वाघमारे यांनी केले आहे.

# विदर्भात ऑरेंज अलर्ट,गारपिटीचा इशारा नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन

**पुणे**-आज राज्यातील विदर्भात पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. नागपूर वेधशाळेने ही माहिती दिली असून नागरिकांनी आवश्यक काळजी घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. गेले काही दिवस महाराष्ट्रासह देशात हवामानातील बदल पाहायला मिळत आहे.विदर्भातील अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया जिल्ह्यात गारपिट होण्याचा 'ऑरेंज अलर्ट' देण्यात आला आहे. तर उर्वरित विदर्भ आणि मराठवाड्यातील परभणी, हिंगोली, नांदेड, जिल्ह्यात विजांसह पावसाचा इशारा 'यलो अलर्ट' तर उर्वरित मराठवाड्यात विजांसह पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. तापमानातही चढ-उतार होण्याचा अंदाज आहे.विदर्भातसह मराठवाड्यातही पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे, २५ ते २७ फेब्रुवारीदरम्यान मराठवाड्यातील ८ जिल्ह्यात ढगाळ वातावरण दिसण्याची शक्यता आहे, तर काही ठिकाणी गडगडाट तसेच सोसाट्याच्या वाऱ्यासह किरकोळ पावसाची शक्यता जाणवत असल्याची माहिती जेष्ठ हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली आहे. मराठवाड्यात विशेषतः जालना हिंगोली परभणी आणि नांदेड या ४ जिल्ह्यात तुरळक पावसाची शक्यता आहे. तर आज आणि उद्या खान्देश भागातील नाशिक नगर जळगाव जिल्ह्यातही ढगाळ वातावरण पाहायला मिळण्याची शक्यता आहे.मराठवाडा आणि परिसरावर चक्राकार वाऱ्यांची स्थिती निवळली असली तरी मराठवाड्यापासून विदर्भ, छत्तीसगड ते आंध्रप्रदेशच्या किनारपट्टी पर्यंत खंडीत वाऱ्यांची स्थिती विरली आहे. छत्तीसगडपासून विदर्भ, कर्नाटक ते उत्तर तामिळनाडूपर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा सक्रिय आहे. यामुळे पावसाला पोषक हवामान होत आहे.दरम्यान, नागरिकांनी आवश्यक काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विदर्भातील काही जिल्यात गारपीट, वादळी वाऱ्यासह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तवलेली आहे. वीज गर्जना होत असताना नागरिकांनी शक्यतो घरातच राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच जिल्ह्यातील नागरिकांनी शासनाच्या सर्व सूचनांचे पालन करावे तसेच स्वसंरक्षणासाठी सतर्क राहावे अशा सूचना देखील प्रशासनाकडून देण्यात आल्या आहे.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .